नोटीस बोर्ड

**Anekant Education Society's**

# Tuljaram Chaturchand College, Baramati

# Notice

**Displayed on : 12/07/2017** **Removed on :** 53

## अल्पसंख्यांक समाजातील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना केंद्र शासनाची मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना सन २०१७–१८

## Web site – www.scholarships.gov.in

केंद्र शासनाकडून **मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौध्द, पारशी, व जैन** अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकोत्तर (Post Matric) शिष्यवृत्ती योजना राज्यामध्ये सन २०१७–१८ साठी **ऑनलाईन** पध्दतीने राबविण्यात येत आहे. यासाठी विद्यार्थ्यांचे नविन शिष्यवृत्ती (Fresh) व शिष्यवृत्तीचे नूतनीकरण (Renewal) करण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. **www.scholarships.gov.in** या संकेतस्थळावरुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. **फक्त ऑनलाईन पध्दतीने भरावयाचे आहेत. कोणत्याही परिस्थितीत ऑफलाईन अर्ज स्विकारण्याची विनंती मान्य केली जाणार नाही.**

* किमान पात्रता व अटी :

१. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
२. मागील परीक्षेत किमान ५०% गुण घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.
३. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा / स्टायपेंड योजनेचा लाभार्थी नसावा.
४. नुतनीकरणासाठी विद्यार्थ्याने पुढील वर्गात प्रवेश घेतलेला असावा.
५. अर्जदाराच्या पालकांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. २ लाख इतकी आहे.
६. एका कुटुंबातील फक्त दोन अपत्यांनाच सदर योजनेचा लाभ घेता येईल.
७. एखाद्या विद्यार्थ्याने चुकीच्या माहितीच्या आधारे किंवा अटींचे उल्लंघन करुन शिष्यवृत्ती मिळवली असेल तर त्याची शिष्यवृत्ती रद्द केली जाईल /वसूल केली जाईल.
८. विद्यार्थ्यांनी आधारकार्ड सादर करणे अनिवार्य आहे.
९. विद्यार्थ्याने राष्ट्रीयकृत बँकेत स्वत:चे खाते उघडणे आवश्यक आहे. तसेच हे खाते आधारकार्डशी संलग्न करणे आवश्यक आहे.

*** विद्यार्थ्यांनी फॉर्मसोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.**

१. अर्जावर विद्यार्थ्यांचे पासपोर्ट साईजचे छायाचित्र (फोटो) स्वाक्षरीसह असावा.
२. मागील वर्षाच्या गुणपत्रिकेची झेरॉक्स प्रत.
३. कायमचा निवासाच्या पत्त्यासंबंधी पुरावा म्हणून शिधापत्रिका, वीज / दूरध्वनी देयक,

४. विद्यार्थ्यांचे अल्पसंख्याक असल्याबाबतचे स्वयंघोषित घोषणापत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.
५. मा. तहसिलदार यांचा शै. वर्ष २०१६–१७ चा उत्पन्नाचा दाखला.
६. बॅंक पासबुकाच्या पहिल्या पानाची — ज्यावर खातेदाराचे नांव, पत्ता, खाते क्रमांक व आय.एफ.एस.सी. कोड नंबरची नोंद आहे, त्याची छायांकीत प्रत जोडावी. सदर बॅंक खाते चालू स्थितीत असावे.
७. आधार कार्डाची छायांकित प्रत जोडावी.
८. प्रवेश फी भरलेल्या चलनाची झेरॉक्स.
९. बोनाफाईड सर्टिफिकेट.

• **<u>अल्पसंख्याक शिष्यवृत्ती सन २०१७–१८ करिता नवीन शिष्यवृत्ती (Fresh) व नूतनीकरण (Renewal) अर्ज करण्यासाठी भारत सरकारने घोषित केलेले वेळापत्रक</u>**

| क्र. | कार्यसूची | अंतिम दिनांक | |
|---|---|---|---|
| | | नवीन शिष्यवृत्ती (Fresh) | नुतनीकरण (Renewal) |
| १ | विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक. | ३१ ऑगस्ट २०१७ | ३१ जुलै २०१७ |

विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेल्या फॉर्मची प्रिंट व आवश्यक कागदपत्रांसहित प्रशासन भवन स्कॉलरशिप विभागामध्ये जमा करावेत. याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

रजिस्ट्रार
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,
बारामती

प्राचार्य
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,
बारामती

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI